ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

मराठवाडयातील निवडक वैचारिक लेखक प्रबोधन व कार्य

प्रा. डॉ. शिवाजीराव मा.देशमुख
मराठी विभाग, तुळजाभवानी महाविदयालय, तुळजापूर

प्रस्ताविक :

मराठवाडयाच्या मातीतच असा गुण आहे की, या मातीने अनेक विचारवंत प्रतिभावंतांना जन्म दिला या भूमित अनेक विचारवंतांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून प्रबोधन केले. या प्रबोधनच्या माध्यमातून मराठवाडयात साहित्य मोठया प्रमाणामध्ये निर्माण झाले. अशा या मराठवाडयात संत नामदेव, ज्ञानेश्वर, गोरोबाकाका, जनाबाई, दासोपंत, एकनाथ, मुक्तेश्वर आदि संत पंत होवून गेले. ज्यांनी आपल्या साहित्याद्वारे दशा झालेल्या समाजाला दिशा दाखविण्याचे काम केले. मराठीच्या सुरूवातीच्या काळापासूनच संत, पंत, कविने जसे योगदान दिले तसेच आधुनिक काळामध्ये ललित साहित्याच्या माध्यमातून आ. क्र. वाघमारे अनंत भालेराव, नरहर कुरुंदकर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, डॉ.स.रा.गाडगीळ, डॉ.गंगाधर पानतावणे, डॉ.जनार्दन वाघमारे, प्रा.बा.ह. कल्याणकर, डॉ.प्रल्हाद लुलेकर, या वैचारिक लेखकांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. या विचारवंतांनी व्याख्यानातून, भाषणातून, विविध विशेषांकातून, साप्ताहिकांमधून प्रबोधनातून जनसामान्यांवर प्रभाव टाकण्याचे काम मोठया प्रमाणावर केले. त्यांच्या या विचारातून एक वैचारिक चळवळ निर्माण झाली. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कतिक आपले मौलिक विचार मांडले.

वैचारिकता ही विवेकाधिष्ठित ज्ञानावर अवलंबून असते. विवेकशक्तीच्या अविष्कार शक्तीतून अविष्कार प्रकट होत असतो. अनुभवाच्या व निरिक्षणाच्या कसोटीतून वैचारिक लेखन झालेले असते. विचारांवर प्रभाव पाडत जाणाऱ्या अनेक व्यक्तींनी लेखन केलेले आहे. गंगाधर पंतावणे यांच्या लेखनीतून दलित समाज व दलित साहित्याला वैचारिकता प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले. तसेच जनार्दन वाघमारे यांनीही दलित वैचारिक लेखनातून विज्ञाननिष्ठा तर्कसंगत चिंतनाने समाज प्रबोधन करण्याचे काम केले. या लेखनीतून त्यांनी सर्जनशील मन निर्माण केले. आपल्या प्रबोधनपर लेखनातून आपण समाज व राष्ट्राचे काहीतर देणे लागतो त्यांच्याविषयी आपण काहीतरी कार्य केले पाहिजे या भावनेतून त्यांनी प्रबोधन केले. अशा विचारावंतांच्या विचारांच्या सामर्थ्यातून समाज व राष्ट्राची जडणघडण होत असते. अज्ञानानी अंधश्रध्देच्या गर्तेतून समाजाने बाहेर पडावे यासाठी या मंडळांनी प्रबोधन केले. डॉ. सूर्यनारायण रणसुभे, प्राचार्य गजमल माळी, प्रा.सुधीर गव्हाणे, डॉ.ऋषिकेश कांबळे, शेषराव मोरे, बाळकृष्ण कवठेकर, प्रा. अविनाश डोळस, यासारख्या विचारवंतांनी खूप मोठे प्रबोधनात्मक वैचारिक साहित्य लेखनातून आधुनिक मराठवाड्याच्या उभारणीला हातभार लावला आहे.

अ.कृ. वाघमारे या विचारवंतांचे मराठवाड्याच्या भूमिवर प्रचंड असे ऋण आहे. त्यांची सामाजिक, राजकीय आणि वैचारिक तसेच वृत्तपत्रे ही कामगिरी प्रचंड मोठी आहे. त्यांच्या कार्याची तुलना टिळक,

आगरकरांच्या परंपरेबरोबर केली जाते म्हणूनच मराठवाड्यातील साहित्यीकांसमोर, विचारवंतांसमोर, त्यांचे विचार सदैव प्रेरणादायी राहिले आहेत. 'मराठवाडा या वृत्तपत्रातील अग्रलेखाने त्यावेळी अनेकांना भुरळ पडली. ते नुसते विचार मांडण्याच्या पडत नसत, तर मानलेले विचार लोकांच्या गळी कसे उतरवता येतील यासाठी ते धडपडत असत.' मराठी भाषा आणि साहित्य चिंतन हिंदूना मारक शैक्षणिक धोरण, शिक्षणात मागासलेले हैद्राबाद धोरण, निजामाचे शैक्षणिक धोरण, मराठी लोकसंख्या विषयक विचार स्वातंत्रप्राप्तीनंतरचे विचार, महाराष्ट्रात परत जागृत होवो यासारख्या विषयांवरती त्यांचे चिंतन मौलिक स्वरूपाचे आहे. 'ज्या भूमिने भारताच्या पडत्या काळात त्याचे गतवैभव, त्याचे मतस्वातंत्र पुन्हा मिळवण्याच्या कामात महाराष्ट्राला पुढारी नेमले व त्यास पुढारीपण स्विकारावयास उद्युक्त केले व त्यांच्या आत्मविश्वास उत्पन्न करून अनेक अडचणींचे डोंगर चढून जाण्यास प्रवृत्त केले. परतुडने महाराष्ट्रा परत जागा हो असा यतोचित संदेश तेथे हजारोंच्या संख्येने जमलेले प्रतिनिधींनी दिला.' अशा प्रकारचा विचार अ.कृ. भालेराव यांनी आपल्या विचारांतून मांडला. अ.कृ. वाघमारे यांचा हैद्राबाद मुक्ती लढयाच्या चळवळीशी प्रत्यक्ष संबंध आल्याने त्यांच्या उत्कृष्ठ लेखणीला विलक्षण धार चढलेली आहे. आनंद भालेराव यांनी मराठवाड्यातील मातीवर आणि येथील माणसांवर मनापासून प्रेम केले. थोर स्वातंत्र सेनानी विचारवंत स्वातंत्रउत्तरकाळातील ध्येयवादी निर्भीड पत्रकार व संपादक, याचबरोबर मराठवाड्याच्या व हैद्राबाद संस्थांनचा अभ्यास असणारे अभ्यासक होते. त्यांनी मराठवाड्यातील जनतेला सदैव जागृत ठेवण्याचे कार्ये केले. मराठवाडा या वृत्तपत्रातून खूप लेखन त्यांनी केले. आलो याची कारणासी, पेटलेले दिवस व कावड यासारख्या ग्रंथातून त्यांनी प्रबोधन पर लेखणीतून प्रभाव टाकला. त्यांची विचार मांडण्याची भूमिका स्पष्ट होती. विचारांचे धोरण निश्चित होते. 'साच भावे वर्ताया या लेखातून त्यांनी' आपली भूमिका कथन केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून सडेतोड विचार मांडले. त्यांच्या विचारांबद्दल ना. ग.गोरे लिहितात, 'निर्भीड निवेदन, साभार प्रतिपादन आणि जनसामान्याबद्दल तळमळ ही अनंतरावांच्या पत्रकारीतेची आणि मराठवाडा वृत्तपत्राची वैशिष्टे. पुन्या मुंबईहून निघणाऱ्या कोणत्याही दैनिकाच्या संपादकीयाहून मराठवाड्याचे अग्रलेख मर्मग्राह्य आहे.

आनंतराव भालेराव यांनी एकूणच साहित्य आणि साहित्यक्षेत्राशी संबंधित फारसे सबंध नसले तरी वृत्तपत्राच्या माध्यमातून चिंतनशील लेखन केले आहे. अनंतराव भालेराव यांनी जे लेखन केले आहे ते आजही वाचनीय आहे. मराठवाड्यातील मागालेपण, सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न, सांस्कृतिक जीवन या विषयी वैचारिक चिंतन आणि मनन या लेखणीतून पाहावयास मिळते. आजही या विचारवंताने दाखविलेल्या पायवाटेनेच मराठवाड्यातील जनता समाज परिवर्तन व राष्ट्रनिर्मितीसाठी जाताना दिसते. किंबहुना अशा विचारावंतांच्या विचारांची कास धरणे हिताचेच आहे.

स.रा.गाडगीळ, मराठवाड्यातील प्रमुख विचारवंत म्हणून त्यांचा आदराने नामउल्लेख केला जातो. त्यांच्या लोकायत या ग्रंथातून त्यांचे वैचारिक योगदान लक्षात येते. त्यांच्या विचारमंथन या लेख संग्रहातून प्राचीन व आधुनिक भारतीय विचारातून सामाजिक, सांस्कृतिक संकल्पनांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या विचारांना प्रादेशिकतेच्या चौकटीत बांधता येत नाही. पाश्चात्य साहित्य समीक्षा व प्राचीन भारतीय समीक्षा यावर सखोल साहित्यचिंतन त्यांनी केले आहे. त्यांनी समता या जीवनमूल्यांचा विचार मांडला आहे. 'समता, विषमता, न्याय, अन्याय यांचा विचार सामाजिक संर्दभातच करावा लागतो. माणसा माणसांच्या सामाजिक संबंधाचे नियमन करण्याच्या गरजेतून या संकल्पना उदयाला आल्या.' असा स्पष्ट विचार ते मांडतात.

त्यांनी उदारमतवाद आणि लोकशाही समाजवाद यावर सखोल चिंतन अनेक लेखणातून मांडले. समाजरचना आणि सांस्कृतिक जीवनाचा पाया आणि इमारत उभारण्यासाठी उत्पादन आणि साधने, त्या उत्पादन साधनांशी असणारे संबंध महत्वाचे असतात असे ते नोंदवतात.

डॉ.नरहर कुरुंदकर यांचे साहित्य क्षेत्रात समीक्षेत तत्वचर्चेत व भाषण कलेत कर्तृत्व महनीय होते. त्यांच्या वैचारिकतेचा कल हा मार्क्सवादाच्या जवळ जाताना दिसतो. तसेच त्यांनी समाजवादी विचारसरणीही अनुसरली होती. कार्लमार्क्सचा विज्ञाननिष्ठ समाजवाद त्यांनी महत्वाचा वाटतो. मराठवाड्यातील थोर विचारवंत म्हणून त्यांचा आदराने उल्लेख केला जातो. डॉ.नरहर कुरुंदकर हे केवळ विचारांचे भाष्यकार होते असे नाही तर ते विशाल मानवी समाजजीवनाचे हितचिंतकही होते. 'नक्की

ठरलेली मते जगाच्या समोर ठेवणे या सॉक्रेटीसाचे मोठे नव्हते त्याचे मोठेपण पूर्वसिध्द ठरलेले विचार समाजाला पटवून देण्यात नव्हते तर समाजाला विचार करायला शिकवणे यात होते. मते सांगणारा तो गुरू नव्हता, तर विचार कसा करावा याचे आधुनिक मुलभूत शिक्षण देणरा तो एक आचार्य होता.' अशा स्वरूपाचे सॉक्रेटिसचे ते वर्णन करतात.

रूपवेद, मागोवा, जागर, यात्रा, राष्ट्रवाद, समाजवाद अशे जवळपास तीस पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यांचे वाणीवर जेवढे प्रभुत्व होते तेवढेच ते एक सिध्दहस्त लेखक म्हणून ख्याती प्राप्त केलेले विचारवंत होते.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या दलितांचे प्रबोधन व डॉ.जर्नादन वाघमारे यांचे हाक आणि आक्रोश या दोन्ही ग्रंथामध्ये समता, बंधुता, स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या मुल्यांना प्रमाण मानून समाज परिवर्तन करण्यासाठी प्रबोधनात्मक लेखन केले. अस्मिता दर्शन सारख्या मुखपत्रातून आंबेडकरवादी विचारसमृध्द जाणीवांना मोकळी वाट करून दिली. 'अस्मिता दर्शन ने दलित साहित्याला व वैचारिक लेखनाला बैठक दिली.'

'दलित म्हणजे आंबेडकरवादी स्वप्नपूर्ती करणारा क्रांतीचा वाहक परिवर्तनाचे नवे जग निर्मिण्याची आकांक्षा बाळगणारा असा अर्थ दलित साहित्याने स्विकारला. कालांतराने आंबेडकरवादी साहित्य अशी संज्ञा रुढ झाली.' या लेखकाने अनेक विचारावंतांच्या जाणीवा अनुभवविश्व समृध्द केले.

डॉ.जनार्दन वाघमारे हे एक कृतीशील विचारवंत आहेत. त्यांच्या विचारांमागे एक निश्चित अशी बैठक आहे म्हणून त्यांना मराठवाड्यातील प्रबोधन आणि परिवर्तनाच्या प्रभवात महत्वाचे स्थान द्यावे लागते. शिक्षण, साहित्य आणि संस्कृती, परिवर्तन चळवळ यामधून त्यांच्या वैचारिकतेचे दर्शन घडते. आपल्यावर झालेल्या वैचारिक प्रभावाविषयावर ते लिहितात, 'फुले, शाहू आणि आंबेडकरांचा वैचारिक वारसा मी मनोमन स्विकारलेला होता. असे ते ठासून सांगतात, मी घेतलेली ती एक प्रकारची वैचारिक दिक्षाच होती.'

या विचारवंतांने हिंदू संस्कृती, पोतीनिष्ठ दैववाद, पारंपारिकता, अंधश्रध्दा, जातीयता, अस्पृश्यता, दास्य, शोषण, गुलामी, विषमता, दारिद्रय, अज्ञान अशा समाज रचनेत मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी लेखन व प्रबोधन केले.

समारोप:

मराठवाड्यातील या विचारावंतांने स्वातंत्रपूर्व व स्वातंत्रानंतर समाज जागृती प्रबोधनाच्या माध्यमातून चळवळ उभी केली. यामध्ये मराठवाडा विकास आंदोलन, नामांतरामूळे निर्माण झालेले प्रश्न, आणीबाणी यासारख्या विषयांवर बांधेसुद व सुसंगत असे विचार मांडले. भावनेचा भडकपणा अथवा वैचारिक गोंधळ दिसत नाही. समाज जागृती चळवळ, संघर्ष, संघठण या चतु:सुत्रीतून या परिसराला वैभव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला. अनेक वेळा तर्कसंगत वस्तुनिष्ठ मांडणीतून खंडणमंडन, टिका, बोध, उपदेश त्यांनी केला.यासाठी व्याख्यान, मुलाखती, परिसंवाद, विविध चर्चासत्रे यातून विचार प्रकट केले. हे विचार मानवी जीवनमुल्याधिष्ठित स्वरूपाचे होते. विशेष:त समता, स्वातंत्रता, बंधुता व न्याय ही मूल्ये त्यांनी जपली. वैचारिक समृध्द प्रबोधनाची परंपरा त्यांनी निर्माण केली. राष्ट्रनिष्ठा, अन्याविरुध्द संघर्ष अशा गुणविशेषाने त्यांचे विचार मंडीत झालेले दिसतात. अनेक वेळा अभिव्यक्ती स्वातंत्रयाचा पुरस्कार केला. तत्वचिंतन, समाजवाद, राष्ट्रवाद यावरही भाष्य केले. सामाजिक व आर्थिक विषमतेचे निर्मूलन करण्यासाठी लोकशाही समाजवाद मांडला. एकंदरीत या विचारवंताने जनतेच्या मनाला प्रबल व प्रबृध्द करण्याचे कार्य यांनी केले. मराठवाड्यातील या विचारवंतांच्या विचारातून अनेक वैचारिक चळवळी आणि समतेच्या चळवळी निर्माण झाल्या. आज मात्र असे विधायक प्रतिवाद होताना आढळत नाही.

संदर्भ ग्रंथ:

१. समग्र भालेराव अनंतराव :— खंड २ रा लेखक — भालेराव निशिकांत
२. संपादक . विनोद शिरसाट ... निवडक कुरुंदकर, पृष्ठ २९
३. गर्गे स.मा. संघर्षखंड पहिला, पृष्ठ ६५

४. गाडगीळ स.रा. विचारमंथन पृष्ठ ३८
५. घाडगे मिरा अस्मिता दर्शन सूची
६. वाघमारे जर्नादन मूठभर माती पृष्ठ ४२